कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सव

१८ ठिकाणी विसर्जन, संकलन केंद्राची व्यवस्था

पुणे :- महानगरपालिका अंतर्गत पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत पर्यावरण पूरक गणेशोत्सवात गणेशमूर्ती विसर्जन व संकलन करिता व्यवस्था करण्यात आली आहे.

सावित्रीबाई फुले प्रशाळा, महाराणा प्रताप विद्यालय, शाहू उद्यान या **०३** ठिकाणी बांधीव हौद तसेच सावित्रीबाई फुले प्रशाला, महाराणा प्रताप विद्यालय, मातोश्री. कै. गयाबाई भानुदास वैरागे उद्यान, शांताबाई लडकत शाळा, राजमाता जिजाऊ शाळा, ऑस्कर मित्र मंडळ, कसबा पेठ पोलीस चौकी जवळ, कलमाडी शाळा, स्वरुपार्धिनी संस्था, खडीचे मैदान आरोग्य कोठी जवळ, भोलागिरी शाळा, बारणे शाळा (१५. नंबर शाळा), डांबर कोठी (जुना बाजार) जवळ, आर.सी.एम शाळा, या **१४** ठिकाणी लोखंडी टाकीची व्यवस्था करणेत आले असून याच बरोबर सावित्रीबाई फुले शाळा, कै. प्रल्हाद दत्तात्रया उर्फ पप्पूशेठ खन्ना प्राथमिक विद्यालय, शांताबाई लडकत शाळा, के.सी ठाकरे शाळा, ०८ नंबर आरोग्य कोठी जवळ या **०५** ठिकाणी गणेश मूर्ती विसर्जन व संकलन केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे.

गणेशमूर्ती विसर्जन करिता एकूण **१४** ठिकाणी **२३** लोखंडी टाकी उपलब्ध करून नियोजन केले आहे. यामध्ये शाडू मातीचे गणेशमूर्ती संकलन करण्याकामी सावित्रीबाई फुले शाळा, महाराणा प्रताप विद्यालय व आर.सी.एम शाळा येथे स्वतंत्र लोखंडी टाकीची व्यवस्था करणेत आली आहे. तसेच गणेश मूर्ती विसर्जित करण्याकरिता तीन हौदांची व पाच ठिकाणी संकलन केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे. याचबरोबर सार्वजनिक गणेशोत्सवात भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय मार्फत गणेश मूर्ती विसर्जित ठिकाणी स्वतंत्र एकूण **१०** निर्माल्य कंटेनर ठेवण्यात आले आहेत.

घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत गणेशमूर्ती विसर्जना करिता भाविकांनी जास्तीत जास्त कृत्रिम हौदामध्ये गणेशमूर्तीचे विसर्जन करणे तसेच शाडू मातीचे गणेश मूर्ती स्वतंत्र उपलब्ध लोखंडी टाकीमध्ये विसर्जन करून गणपती बाप्पांना निरोप द्यावा, असे प्रबोधन व जनजागृती करण्यात येत आहे. गणेशोत्सव कालावधीत ०१ वरिष्ठ आरोग्य निरीक्षक, ११ आरोग्य निरीक्षक, २१ मुकादम यांच्या निरीक्षणाखाली जादा कामकाजाकरिता ३०६ सफाईसेवक यांची नेमणूक करून सफाईसेवक यांच्या कडून दैनंदिन लक्ष्मी रोड, छत्रपती शिवाजी महाराज रोड, नेहरू रोड, गणेश रोड, शंकर शेठ रोड, जुना बाजार रोड, सेव्हन लव्ज चौक या मिरवणूक मार्ग व मुख्य रस्ते आणि भागांची स्वच्छता व कचरा उठाव तात्काळ करण्यात येत आहे.

गणेशोत्सवा दरम्यान परिसरातील नागरिक, भाविक व गणपती देखावे बघण्यासाठी येणारे नागरिक यांच्या सोयीकरिता इतर अन्य उपाय योजना करण्याचे कामकाज चालू असून नागरिकांना कोणत्याही प्रकारे अडचण निर्माण होणार नाही. नागरिकांसाठी गणेशोत्सव कालावधी मध्ये आरोग्यमयी वातावरण ठेवण्याची दक्षता घेतली जात आहे.

sd/-
महापालिका सहाय्यक आयुक्त
कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका